डिसेंबर
२०२५

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२८२९/२०२६

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

डिसेंबर २०२५



## मा. डॉ. विलास खर्चे यांची महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड



**दि. २ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदी मा. डॉ. विलास काशिनाथराव खर्चे यांची मा. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी निवड केली आहे. कुलगुरूपदी निवड होण्याआधी ते डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे संशोधन संचालक म्हणून २०१७ पासून कार्यरत होते. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि ICAR– राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि भूमी उपयोग नियोजन ब्युरो, नागपूर येथे मृदाशास्त्रात (भूमी संसाधन व्यवस्थापन) पीएच.डी. पूर्ण केली आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये डॉ. विलास खर्चे यांनी नऊ वर्ष विविध पदांवर सेवा दिलेली आहे. त्यात मायक्रोन्यूट्रिएंट संशोधन प्रकल्पाचे प्रमुख, ICAR-AICRP-STCR प्रकल्प, सह प्राध्यापक, NATP नोडल अधिकारी आणि नियोजन अधिकारी म्हणूनही त्यांनी काम केले आहे. नंतर त्यांची डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे प्राध्यापक म्हणून निवड झाली. त्यांनी अकोला कृषि विद्यापीठात विविध पदांवर काम करून आपला ठसा उमटवला आहे. यात मृदाशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख, नागपूर येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता आणि नोव्हेंबर २०१७ पासून विद्यापीठाचे संशोधन संचालक म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्याकडे अधिष्ठाता (कृषि) चा पदभार दीड वर्ष होता. आत्तापर्यंत त्यांनी दोन्ही विद्यापीठांमध्ये शिक्षण, संशोधन आणि विस्तारामध्ये ३० वर्षाची प्रदीर्घ सेवा दिलेली आहे. मृदाशास्त्र, भूमी संसाधन व्यवस्थापन, पेडोलॉजी, मृदा गुणवत्ता व आरोग्य, तसेच क्षारपड जमिनांचे व्यवस्थापन या विषयांमध्ये त्यांनी त्यांचा संशोधनाचा ठसा उमटवला आहे.

डॉ. खर्चे यांनी मृदा व एकात्मिक खत व्यवस्थापन यावर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी शाश्वत शेतीसाठी उपयोगी ठरलेले असे संशोधन केले आहे. त्यांनी दीर्घकालीन मृदा गुणवत्तेतील बदल, संरक्षण तंत्रज्ञान आणि क्षारपड जमिन सुधारणा याबाबतीत महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यांचे आत्तापर्यंत १२३ संशोधन लेख, १६६ विस्तार लेख आणि ५३ पुस्तके/संशोधन पुस्तिका प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांनी मृदा आरोग्य व्यवस्थापन, समस्या असलेल्या जमिनींसाठी आणि पिकांच्या एकात्मिक खत व्यवस्थापनावर अनेक तंत्रज्ञान शिफारसी दिल्या आहेत. ते २०१७ पासून अकोला विद्यापीठाचे मोठे संशोधन प्रकल्प यशस्वीपणे, आयोजन, नियोजन आणि देखरेख करीत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक पीक वाण, पीक उत्पादन तंत्रज्ञानाच्या शिफारशी विकसित केल्या आहेत. त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर संशोधनासाठी सामंजस्य करार घडवून आणले आहेत. त्यांनी आत्तापर्यंत १० पीएच.डी., तसेच २४ M.Sc. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. ते विविध शैक्षणिक आणि संशोधन प्रकल्पांचे प्रमुख होते आणि काही बाह्य अनुदानित प्रकल्पही त्यांनी पूर्ण केले आहेत.

डॉ. खर्चे यांना कृषि क्षेत्रातील शेतकरीभिमुख संशोधन प्रकल्प मिळविणे व त्यांची अंमलबजावणी करणे याचा मोठा अनुभव आहे. त्यांनी मृदा आरोग्य व्यवस्थापन आणि पिकांच्या खत व्यवस्थापनावर धोरणात्मक पुस्तके प्रकाशित केली आहेत. ते विविध राष्ट्रीय शैक्षणिक व तांत्रिक समित्यांवर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. राष्ट्रीय स्तरावरील जर्नल्सचे संपादक म्हणूनही काम करत आहेत. त्यांनी मृदा गुणवत्ता, एकात्मिक खत व्यवस्थापन, GIS तंत्रज्ञानाचा वापर करून मृदा आरोग्य मापन आणि खराब जमिनींच्या सुधारणा या क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्यामुळे त्यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. ते महाराष्ट्र विज्ञान अकादमी, पुणे आणि इंडियन सोसायटी ऑफ सॉईल सर्व्हे ॲण्ड लँड युज प्लॅनिंग संस्थेचे फेलो आहेत. त्यांच्या शिक्षण, संशोधन आणि शेतकरीभिमुख कार्यामुळे त्यांची राज्याचे मा. राज्यपाल श्री. आचार्य देवव्रत यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड केली आहे. या निवडीबद्दल अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांचा सत्कार समारंभ संपन्न



**दि. २ डिसेंबर, २०२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा पदभार स्विकारल्यानंतर विद्यापीठात मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व राहुरी विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी व्यासपीठावर सौ. मंदाकीनी गडाख, सौ. सुरुची खर्चे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता इंजि. मिलिंद ढोके, प्रभारी कुलसचिव विजय पाटील, नागपूर येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश कडू, डॉ. कौस्तुभ खर्चे उपस्थित होते.

यावेळी नवनियुक्त मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की बदलत्या हवामानाचा परिणाम शेतीवर होत आहे. जमिनीचे आरोग्य खालावले असून त्याचा परिणाम पिकांच्या उत्पादकतेवर होत आहे. विद्यापीठामध्ये सेंद्रिय शेतीबरोबरच नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरु आहेत. याचबरोबर शेती शाश्वत कशी करता येईल या विषयीचे संशोधन करावे लागेल. या विद्यापीठाचे देशात व देशाबाहेर मोठे नाव आहे. हे विद्यापीठ इतर कृषि विद्यापीठांसाठी दीप स्तंभाप्रमाणे आहे. या विद्यापीठात काम करणे याचा सार्थ अभिमान आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने संशोधनामध्ये भरीव कामगिरी केलेली आहे. या विद्यापीठाची उंची कायम ठेवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने पूर्ण क्षमतेने प्रयत्न करु. प्रत्येकाने समर्पणवृत्तीने काम केले तर निश्चितच राज्यातील शेतकरी, राज्याच्या प्रगतीबरोबरच सर्वांची प्रगती होईल. पिकांची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी विद्यापीठातील ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्ता, रिमोट सेंसिंग यासारख्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची मदत घेतली जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी कुलगुरुपदी निवड केल्याबद्दल त्यांनी राज्यपालांचे आभार मानले. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. शरद गडाख म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी ३२१ पेक्षा जास्त वाण, ५५ यंत्रे तर २००० पेक्षा जास्त तंत्रज्ञान शिफारशी दिलेल्या आहेत. भविष्यात संशोधन करतांना शेतकऱ्यांची गरज ओळखून संशोधनावर भर द्यावा लागेल. सध्या विद्यापीठातील ६५ टक्के जागा रिक्त आहेत. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडून मिळणारा निधी तसेच राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान कमी झाले आहे. विद्यापीठ आत्मनिर्भर होण्यासाठी बिजोत्पादन व विविध कृषि निविष्ठा मोठ्या प्रमाणात उत्पादन करणे त्याचबरोबर नवनविन प्रकल्प शासनाकडून मंजुर करुन घेणे महत्वाचे ठरणार आहे. येथून पुढे सर्वांनी जबाबदारीने काम करुन एका दिशेने, एका विचाराने व एका ध्येयाने आपले कार्य पुढे नेण्याचे महत्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तीन विद्यापीठांचे कुलगुरुपद भुषविण्यास मिळाले त्याबद्दल त्यांनी राज्यपालांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले. यावेळी डॉ. साताप्पा खरबडे, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. प्रशांत बोडके, डॉ. प्रकाश कडू, इंजि. मिलिंद ढोके, डॉ. नितीन दानवले व डॉ. महाविरसिंग चौहान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी काष्टी येथील कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, कृषिभूषण सुरसिंग पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार श्री. विजय पाटील यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अकोला कृषि विद्यापीठाचे अधिकारी, दापोली कृषि विद्यापीठाचे अधिकारी, राहुरी कृषि विद्यापीठाचे सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, निवृत्त शास्त्रज्ञ, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

डिसेंबर २०२५

## मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांची कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाला भेट



**दि. ७ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी पुणे कृषि महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. या भेटीदरम्यान मा. कुलगुरू महोदयांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या सेंटर ऑफ एक्सलन्सच्या बांधकामाची पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्यासमवेत पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने होते. यावेळी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. धीरज कंखरे, जैविक किड नियंत्रण योजनेचे प्रमुख डॉ. संतोष मोरे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ताई देवकाते, विभागीय विस्तार केंद्रातील डॉ. मृणाल अजोतीकर व डॉ. विकास भालेराव, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र विभागातील डॉ. सुजित भालेराव व सौ. विद्या पिंपरकर तसेच देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी संशोधन केंद्राने जोपासलेल्या सहिवाल, गीर, राठी, थारपारकर आणि लाल सिंधी या देशी दुधाळ गोवंशांची व खिलार, लाल कंधारी, देवणी, गवळाऊ, कोकण कपिला, डांगी आणि पुंगनूर या देशी गोवंशांची पाहणी केली. संशोधन केंद्रातील सर्व गोठे, दूध उत्पादन व प्रक्रिया युनिट, बायोगॅस सयंत्र, सौर ऊर्जा युनिट, शेण व गोमूत्र प्रक्रिया युनिट, पशुधनाकरता आवश्यक असणाऱ्या आयुर्वेदिक औषधींची धन्वंतरी बाग, गो परीक्रमा, वातावरण नियंत्रित गोठा तसेच संशोधन केंद्राने विकसित केलेले एकात्मिक गोपालन मॉडेल या सर्व बाबींची त्यांनी पाहणी केली. केंद्राद्वारे राबविल्या जात असलेल्या विविध संशोधन कार्यक्रमांची व प्रशिक्षण व विस्तार कार्यक्रमांची त्यांनी माहिती घेतली. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. खर्चे म्हणाले की नैसर्गिक शेतीमध्ये देशी गाईंची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेता उभे केलेले हे काम अत्यंत समय सूचक आहे. संशोधन केंद्र कृषिविद्या, कृषि सूक्ष्मजीवशास्त्र, कृषि कीटकशास्त्र, वनस्पती विकृतीशास्त्र, मृदा शास्त्र, कृषि अभियांत्रिकी, कृषि अर्थशास्त्र, कृषि विस्तार, अशा कृषितील सर्व विद्याशाखांना सोबत घेऊन आंतरविद्याशाखीय सहभागातून संशोधन करीत असल्याने त्यास वेगळेच महत्त्व प्राप्त होत आहे. या संशोधन केंद्राने केलेल्या कामाची दखल केवळ देशभरातच नव्हे तर जगभरात घेतली जाणे गरजेचे आहे व हे सर्व काम, त्याचे वैज्ञानिक निष्कर्ष यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणार असे त्यांनी यावेळी सांगितले. नैसर्गिक शेतीचा पाया देशी गाय आहे त्यामुळे देशी गाईंचे तसेच त्यांच्या विविध जातींचे संवर्धन व संगोपन होणे ही काळाची गरज आहे असे यावेळी ते म्हणाले.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये भारतीय मानक ब्यूरो (BIS) च्या विद्यार्थी शाखेचे उद्घाटन

**दि. १३ डिसेंबर, २०२५.** कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या डॉ. अण्णासाहेब शिंदे सभागृहात भारतीय मानक ब्यूरो (BIS) च्या विद्यार्थी शाखेच्या (स्टुडन्ट चाप्टर) उद्घाटनाचा कार्यक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील भारतीय मानक ब्युरोचे संचालक तथा प्रमुख श्री. एस.डी. राणे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, काष्टी, मालेगाव येथील कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे व अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

डिसेंबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की विद्यापीठातील सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील मानकांचे शिक्षण मिळावे, औद्योगिक मानके आणि गुणवत्ता नियंत्रणाविषयी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष माहिती मिळावी, यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या 'भारतीय मानक ब्यूरो' (BIS) विद्यार्थी शाखेचे योगदान नक्कीच मोठे आहे. हे पाऊल कृषि अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरसाठी तयार करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. गुणवत्ता आणि मानकीकरण हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहे.

यावेळी श्री. एस. डी. राणे यांनी BIS च्या कार्याची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, मानके केवळ उत्पादन क्षेत्रासाठीच नव्हे तर दैनंदिन जीवनातील प्रत्येक प्रक्रियेत अत्यंत आवश्यक आहेत. त्यांनी या शाखेद्वारे विद्यार्थ्यांना BIS च्या प्रयोगशाळा आणि उत्पादक कंपन्याची गुणवत्ता मुल्यांकन कार्यप्रणाली जवळून अनुभवण्याची संधी मिळेल अशी आशा व्यक्त केली. यावेळी डॉ. सचिन नलावडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी कृषि विद्यापीठ आणि बि.आय. एस. यांच्यातील सामंजस्य कराराची माहिती दिली. यामध्ये संशोधन, मानक आधारित शेती आणि कृषि शिक्षण या क्षेत्रात होणाऱ्या संयुक्त कृतीबाबतीत सांगीतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी शाखेचे मार्गदर्शक डॉ. अवधूत वाळुंज व आभार प्रदर्शन डॉ. विक्रम कड यांनी केले. यावेळी कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा नाशिक येथील कार्डियन करेक्ट या संस्थेबरोबर सामंजस्य करार संपन्न



**दि. १७ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व नाशिक येथील कार्डियन करेक्ट इंटरनॅशनल संस्थेबरोबर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. युवा उद्योजक तयार करणे, शेतकऱ्यांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यापीठातील तंत्रज्ञान अवगत करणे, नैसर्गिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार हा या सामंजस्य कराराचा उद्देश आहे. यावेळी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे व कार्डियन करेक्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र अमृतकर यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करताना म्हणाले की शेतीमध्ये मोठे बदल होत

आहेत. शेतकरी शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करत आहे. विद्यापीठातही विविध पिकांवर नाविन्यपूर्ण संशोधन झालेले आहे. हे संशोधन जास्तीतजास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत जाण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे यांनी या सामंजस्य कराराबद्दल माहिती दिली. याप्रसंगी कार्डियन करेक्टचे श्री.रवींद्र अमृतकर यांनी त्यांच्या संस्थेमार्फत सध्या सुरू असलेल्या कम्युनिटी रेडिओ तसेच कृषि कौशल्य परिषदेमार्फत विविध फळांचे मूल्यवर्धन याविषयी माहिती दिली. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, मृदशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, कृषि कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उत्तम कदम, उद्यानविद्या विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर शिरसागर, वरिष्ठ कापूस पैदासकार तथा कुलगुरूंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल व कार्डियन करेक्टचे विविध पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले.

## मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांची पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राला भेट



**दि. १९ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राला भेट दिली. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते. यावेळी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राने ऊस पिकातील जागतिक दर्जाचे काम उभे केले आहे. यामध्ये आजपर्यंत कार्यरत होऊन गेलेल्या सर्व ऊस विशेषज्ञांपासून ते प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्या सर्व मजुरांचा देखील महत्त्वाचा व मोलाचा वाटा आहे. संशोधन केंद्राची इथपर्यंतची यशस्वी वाटचाल होण्यामध्ये विद्यापीठाचे सर्व माजी कुलगुरू व संशोधन संचालकांचे देखील मोठे योगदान आहे. या यशस्वी कामामध्ये सातत्य राखणे महत्त्वाचे असून आज अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या घरांना या ऊस संशोधन केंद्राने विकसीत केलेल्या वाणांची नावे दिली आहेत हेच या संशोधन केंद्राचे सर्वात मोठे वैभव आहे.

याप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले की या संशोधन केंद्राची इमारत जुनी झाल्यामुळे महाराष्ट्र शासनाने संशोधन केंद्रास नवीन प्रशासकीय इमारत, प्रयोगशाळा, शेतकरी प्रशिक्षण सभागृह व कर्मचारी निवासस्थानांकरीता भरीव मदत केल्याबद्दल मी शासनाचे आभार व्यक्त करतो. संशोधनाचे कार्य प्रभावीरीत्या पुढे नेण्यासाठी केवळ इमारतीच नव्हे तर प्रयोगशाळांमध्ये आधुनिक उपकरणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्स असे आधुनिक तंत्रज्ञान, रस्ते, कुंपण भिंत, अश्या स्वरूपाच्या अनेक सोई–सुविधा निर्माण करण्यासाठी संशोधन केंद्राचे आधुनिकीकरण व बळकटीकरण होणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. या संशोधन केंद्रातील ऐतिहासिक जुन्या वास्तू, वस्तू, यंत्रे व उपकरणांचे वारसा स्वरूपात जतन व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या संशोधन केंद्राची आजपर्यंतची वाटचाल कौतुकास्पद असून सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत. यावेळी त्यांनी संशोधन केंद्राच्या नवीन होऊ घातलेल्या कार्यालयीन इमारती, प्रयोगशाळा, शेतकरी प्रशिक्षण व निवासस्थान तसेच कर्मचारी निवासस्थान या जागांची देखील त्यांनी पाहणी करुन महत्वपूर्ण सूचना केल्या.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी कुलगुरु महोदयांनी संशोधन केंद्रातील सर्व विभाग, प्रयोगशाळा, संशोधन, बिजोत्पादन व प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, निवासस्थाने प्रक्षेत्र यांना भेटी देऊन सर्व संशोधन व विस्तार कामाचा आढावा घेतला. भेटीच्या

सुरुवातीस डॉ. राजेंद्र भिलारे यांनी संशोधन केंद्राचा इतिहास, प्रक्षेत्र, संसाधने, मनुष्यबळ, चाललेले संशोधन व विस्तार कार्य आणि इतर सर्व उपक्रमांबद्दल सविस्तर सादरीकरण करून माहिती दिली. याप्रसंगी संशोधन केंद्रातील ऊस शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. कैलास भोईटे, ऊस रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे व ऊस पैदासकार डॉ. सुरेश उबाळे यांच्यासह सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी तर आभार डॉ. सुरेश उबाळे यांनी मानले.

## कृषि विज्ञान प्राध्यापक सहकारी पतसंस्थेच्या मोबाईल अ‍ॅप व दिनदर्शिका २०२६ चा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न





**दि. २५ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि विज्ञान प्राध्यापक सहकारी पतसंस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आधुनिक मोबाईल बँकिंग अ‍ॅप व दिनदर्शिका २०२६ चे दिमाखदार लोकार्पण सोहळा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे व पतसंस्थेचे चेअरमन डॉ. नारायण मुसमाडे उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की संस्थेच्या ५० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे मोठे महत्त्व आहे. डिजिटल युगाशी जुळवून घेण्यासाठी संस्थेने सुरू केलेले मोबाईल अ‍ॅप सभासदांसाठी अत्यंत सोयीचे ठरेल. पतसंस्था पारदर्शक व विश्वासार्ह पद्धतीने चालवली जात असल्याचे समाधान आहे. भविष्यातही पतसंस्था आधुनिकतेचा स्वीकार करत सभासदांच्या हितासाठी नावीन्यपूर्ण योजना राबवून अधिक सक्षम आणि आदर्श सहकारी संस्था म्हणून आपली ओळख अधिक दृढ करेल असा विश्वास व्यक्त करून पतसंस्थेच्या पुढील उज्वल वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. नारायण मुसमाडे यांनी संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या ५० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा सविस्तर आढावा घेतला. याप्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते दिनदर्शिका व मोबाईल अ‍ॅपचे औपचारिक विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमन सौ. माधुरी अवताडे यांनी केले तर आभार डॉ. विक्रम कड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, पतसंस्थेचे संचालक श्री. दत्तात्रेय कदम, श्रीमती भारती बरे, श्री. आप्पासाहेब चोपडे, श्री. योगेश भिंगारदे, पतसंस्थेचे सचिव श्री. दीपक आढाव तसेच सेवकवर्ग व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे जागतिक मृदा दिन संपन्न

**दि. ५ डिसेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील मृद विज्ञान विभागाच्या वतीने निरोगी शहरांसाठी निरोगी माती या संकल्पनेवर आधारित बारावा जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या मृदू विज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. जालंधर पाटील, सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या मृद विज्ञान विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. सुभाष ढाणे, राहुरी कृषि विद्यापीठाच्या मृद विज्ञान विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. अजितकुमार देशपांडे, डॉ. अर्जुन बांगर, डॉ. अशोक पाटील, भारतीय किसान संघाचे संघटन मंत्री श्री. चंदन पाटील, डॉ. अशोक पाटील, ज्येष्ठ मृदा शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद जगताप, आयसीआयसीआय फाउंडेशनचे पश्चिम विभाग प्रमुख श्री. दीपक पाटील व पुणे येथील मिटकॉनचे श्री. विशाल डावखर उपस्थित होते.

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करताना म्हणाले की हरितक्रांतीनंतर हायब्रीड बियाणे व रासायनिक खते आल्यानंतर उत्पादन वाढले असले तरी या काळात जमिनीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाले. त्यानंतर पाण्याचे दुर्भिक्ष, शेणखताचा कमी वापर, सेंद्रिय खताचा जास्त वापर न करणे यामुळे नैसर्गिक शेतीकडे वळावे लागत आहे. यापुढील काळात जमिनीच्या आरोग्याच्या संवर्धनासाठी नैसर्गिक शेतीला अधिक प्राधान्य द्यावे लागणार आहे. यावेळी डॉ. जालंदर पाटील म्हणाले की शेतीमध्ये ए आयचे तंत्रज्ञान आले आहे. त्याचा वापर विद्यार्थ्यांनी करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. डॉ. सुभाष ढाणे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की जमिनीत वेगवेगळे घटक संतुलित प्रमाणात राहिले तरच ही माती टिकणार आहे. त्यासाठी वेळोवेळी माती परीक्षण करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मृद विज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. अविनाश गोसावी यांनी केले. डॉ. धर्मेंद्र फाळके यांनी संशोधन व विस्तार कार्याचा आढावा घेतला. डॉ. दीप्ती वाघधरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात रब्बी व उन्हाळी हंगामासाठीची विभागीय बैठक संपन्न



**दि. १६ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठात विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक रब्बी व उन्हाळी-२०२५ चे आयोजन हायब्रीड मोडमध्ये करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे होते. यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कोल्हापूरचे विभागीय कृषि सहसंचालक बसवराज मास्तोळी, नाशिकचे विभागीय कृषि सहसंचालक सुभाष काटकर, पुणे विभागीय कृषि सहसंचालक यांचे प्रतिनिधी म्हणुन कृषि अधिकारी राऊत व श्रीरामपूरचे उपविभागीय कृषि अधिकारी प्रविण गोसावी उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की हवामान बदलाचा विपरीत परिणाम विविध पिकांवर होत आहे. यावर्षी खरीप हंगामात ऑक्टोबरपर्यंत पाऊस पडला. अजूनही काही भागात जमिनीमध्ये अधिक ओलावा असल्यामुळे रब्बी

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

पिकांच्या पेरण्या झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत विविध पिकातील उशीरा तयार होणाऱ्या वाणांची गरज निर्माण झाली आहे. यासाठी बदलत्या हवामानाला अनुकुल असणाऱ्या वाणांची निर्मिती करणे गरजेचे आहे. पारंपारीक पध्दतीने शेती करण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. हवामानाचा विपरीत परिणाम जमिनीवर होत आहे. अशा जमिनीत निविष्ठा वापरण्यासाठीचे पोषक वातावरण नसते. परिणामी पिकांची उत्पादकता कमी होते. यासाठी विद्यापीठातील हवामान अद्ययावत काटेकोर शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना वरदान ठरेल. काटेकोर शेतीचे तंत्रज्ञान वापरले तर निविष्ठा कमी लागतील व परिणामी शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होईल.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विठ्ठल शिर्के यांनी संशोधन अहवालाचे सादरीकरण केले. डॉ. साताप्पा खरबडे यावेळी म्हणाले की पाऊस लांबल्यामुळे पेरण्यासुध्दा लांबल्या असून जमिनीतील ओलाव्यामुळे किडी व रोगांचा प्रादुर्भात वाढेल. यावेळी शेतकऱ्यांनी विद्यापीठ प्रसारीत करत असलेल्या सल्ला व मार्गदर्शनाचा लाभ घेवून रोग व किडींचे निर्मुलन करावे. यावेळी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, नाशिक व पुणे या कृषि विभागांचे कृषि सहसंचालक बसवराज मास्तोळी, सुभाष काटकर व व पुणे विभागीय कृषि सहसंचालक यांचे प्रतिनिधी म्हणुन कृषि अधिकारी राऊत यांनी त्यांच्या विभागांचा अहवाल सादर केला. या बैठकीदरम्यान विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. सुनील अडांगळे यांनी मानले. या बैठकीसाठी विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता, कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व विभाग प्रमुख, उपविभागीय कृषि अधिकारी, विद्यापीठ शास्त्रज्ञ व कृषि विभागाचे अधिकारी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा कौशल्य विकासासाठी एज्युस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि. या कंपनीशी सामंजस्य करार



**दि. ९ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या उपस्थितीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा आणि मुंबई येथील एज्युस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि. या संस्थेबरोबर कौशल्य विकास शिक्षण व प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार झाला. कृषि विद्यापीठाच्या वतीने अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे आणि एज्युस्पार्कच्या वतीने नाशिक येथील कौशल्य विकास केंद्राचे संचालक डॉ. एम.जी. शिंदे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, डॉ. रवि आंधळे व कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील कदम उपस्थित होते.

एज्युस्पार्क संस्था शिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रात अग्रेसर आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम.आय.डी.सी.) सहयोगाने या संस्थेची राज्यभर कौशल्य विकास केंद्रे कार्यरत असून नाशिकमध्ये सातपूर येथे त्यांचे अत्याधुनिक कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदवीका, पदवी, पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना कौशल्य आधारीत शिक्षण व प्रशिक्षणाची संधी प्राप्त होणार आहे. महाविद्यालयाच्या आंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना स्टुडंट रेडी कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविणे सोपे होणार आहे. एज्युस्पार्कच्या कौशल्य विकास केंद्राद्वारे दिले जाणारे प्रशिक्षण राष्ट्रीय शैक्षणीक धोरण–२०२० ला अनुसरुन असून याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता वाढीस लागणार आहे. एज्युस्पार्कच्या हॅन्डसॅ–ऑन–ट्रेनिंग आणि ऑन–द–जॉब पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल. या संस्थेद्वारे विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातील. या कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना स्वतः चा स्टार्टअप सुरु करणे शक्य होईल. हा करार म्हणजे कौशल्य विकास उद्योजकतेला चालना देणारा ठरणार आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

डिसेंबर २०२५

वर्ष :५५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## डाळिंब लागवड व प्रक्रिया या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन






**दि. ९ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या इंडो इस्राईल कृषि प्रकल्प, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे, डाळिंब गुणवत्ता केंद्र व अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम २०२५–२६ चे आयोजन करण्यात आले होते. डाळिंब लागवड व प्रक्रिया या विषयावर आयोजित या प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विठ्ठल शिर्के होते. यावेळी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील, अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. एस.पी. गायकवाड व कृषि विभागाचे सहाय्यक कृषि अधिकारी श्री. डी.आर. पाटील उपस्थित होते.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की डाळिंबाचे फळ हे विविध औषधी गुणधर्म, जीवनसत्वे व खनिजे यांचा मोठा स्रोत असल्यामुळे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे फळ झाले आहे. अलीकडे सर्वजण प्रकृतीकडे सजगपणे पाहायला लागले आहेत. वाढत्या मागणीमुळे बाजारात डाळिंबाला सध्या चांगला दर मिळत आहे. प्रक्रियायुक्त पदार्थांना देश विदेशात मोठी मागणी आहे. फळापेक्षा जास्त किंमत प्रक्रियायुक्त पदार्थांना मिळते. डाळिंब पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी डाळिंबाच्या फळ प्रक्रियेकडे लक्ष दिल्यास शेतकरी अधिक सक्षम होतील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी.टी. पाटील यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रकाश मोरे यांनी तर आभार डॉ. अजय हजारे यांनी मानले. यावेळी डॉ. सचिन मगर, डॉ. सुवर्णा देवरे व प्रशिक्षणासाठी आलेले कानडगाव, निंभेरे व तांभेरे येथील २५ डाळिंब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दि. ११ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या इंडो इस्राईल कृषि प्रकल्प, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे, डाळिंब गुणवत्ता केंद्र व अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. डाळिंब लागवड व प्रक्रिया या विषयावर आयोजित या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी वनस्पती रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, उद्यानविद्या विभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर, अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सुभाष गायकवाड व तालुका कृषि अधिकारी श्री. बापूसाहेब शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की माती पाणी परीक्षण करूनच शेतकऱ्यांनी डाळिंब लागवड करावी. पिकाचे पोषण जमिनीतूनच होत असल्यामुळे जमिनीचे आरोग्य महत्त्वाचे आहे. निर्यातीसाठी महत्त्वाच्या असलेल्या मानकांचा संपूर्ण अभ्यास असला पाहिजे. विद्यापीठाने तयार केलेले डाळिंब लागवड तंत्रज्ञान वापरून व कृषि विभागाच्या योजनांच्या सहकार्याने शेतकऱ्यांनी डाळिंबाची निर्यातक्षम शेती करावी व परकीय चलन मिळवावे. शेतीला मूल्यवर्धनाची जोड दिली तरच शेतकरी सक्षम होईल व पर्यायाने देश सक्षम होईल.




यावेळी डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की कोरडवाहू शेतीमध्ये डाळिंब पीक महत्त्वाचे आहे. शेतकरी बांधवांनी डाळिंबाची रोपे ही विद्यापीठातूनच खरेदी करावीत त्याचबरोबर वाणांची निवड सुद्धा शास्त्रज्ञांच्या सल्ल्यानेच करावी. माती, पाणी तपासणी करणे या मूलभूत गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. यावेळी डॉ. रवींद्र गायकवाड यांनी फुले सुपर बायोमिक्स या जैविक बुरशीनाशकाविषयी उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. डी. बापुसाहेब शिंदे यांनी यावेळी उपस्थितांना कृषि विभागाच्या विविध योजना, अनारनेट व महाविस्तार ॲप याबद्दल माहिती दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तीन दिवसांच्या या निवासी प्रशिक्षणात गुटी कलम, छाटणी प्रात्यक्षिक, सूत्र कृमी व्यवस्थापन, रोग व कीड व्यवस्थापन, डाळिंब लागवड व प्रक्रियेशी संबंधीत विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शन केले. या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रकाश मोरे यांनी तर आभार डॉ. अजय हजारे यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी कानडगाव, निंभेरे व तांभेरे येथील २५ डाळिंब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## नाचणी लागवड तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम मानोरी येथे संपन्न



**दि. १८ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, कृषि विभाग महाराष्ट्र शासन आणि दीपस्तंभ ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी, मानोरी यांच्या संयुक्त विद्यमाने नाचणी लागवड तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम मौजे मानोरी, ता. राहुरी येथे संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई, दीपस्तंभ ॲग्रो फार्मर कंपनीचे संचालक डॉ. दत्तात्रय वने, तालुका कृषि अधिकारी बापुसाहेब शिंदे, डॉ. सुनील अडांगळे, डॉ. योगेश बन व मंडळ कृषि अधिकारी अशोक गिरगुणे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की तृणधान्यांचे पोषणमुल्य लक्षात घेता सर्व सामन्यांच्या दृष्टीने तृणधान्य आहारात असणे गरजेचे आहे. आपली रोगप्रतिकारकशक्ति उत्तम ठेवण्यासाठी तृणधान्याचा वापर आहारात वाढविणे गरजेचे आहे. पोषणमुल्य सुरक्षेसाठी आहारात तृणधान्यांचा समावेश अत्यावश्यक आहे. यावेळी डॉ. आनंद चवई, मार्गदर्शन करतांना म्हणाले की राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत नाचणी व पौष्टिक तृणधान्य पिकांचे आहारातील महत्व, लागवडीचे महत्व आणि अपारंपारिक भागात लागवड क्षेत्र,

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
डिसेंबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

उत्पादन व उपलब्धता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतावर प्रायोगिक प्रात्यक्षिक घेण्यात येत आहेत. त्यामुळे तृणधान्य पिकांचे पोषणमुल्य व महत्व लक्षात घेता शेतकऱ्यांनी या पिकांची लागवड करावी व आर्थिक उन्नती साधावी असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील अडांगळे यांनी केले. यावेळी डॉ. योगेश बन यांनी विविध तृणधान्य पिकांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. सुनील अडांगळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी बचटगटांच्या महिला प्रतिनिधी याच्यासह ५० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

## डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन





**दि. १८ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या इंडो इस्त्राईल कृषि प्रकल्प, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे, डाळिंब गुणवत्ता केंद्र व अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत डाळिंब उत्पादक शेतकर्यांसाठी तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. डाळिंब लागवड व प्रक्रिया या विषयावर आयोजित या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. यावेळी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील, अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सुभाष गायकवाड व प्रगतशील शेतकरी शामराव लोंढे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की कोरडवाहू फळपिकात डाळिंब हे महत्त्वाचे पीक आहे. डाळिंब पिकाने मोठी क्रांती करून डाळिंब उत्पादक शेतकर्यांच्या जीवनात उर्जितावस्था आणली. कृषि विद्यापीठात मर व तेल्या रोगावर बहुमूल्य असे संशोधन झाले आहे. शेतकरी बांधवांनी फळपिकांमध्ये सुरुवातीपासूनच खबरदारी घेणे महत्त्वाचे असते. विद्यापीठाचे तंत्रज्ञान वापरून डाळिंब पिकावरील तेलकट डाग व मर या रोगांचे योग्य व्यवस्थापन केल्यास उत्पन्नात भरीव वाढ होईल. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तीन दिवसांच्या या निवासी प्रशिक्षणात गुटी कलम, छाटणी प्रात्यक्षिक, सूत्र कृमी व्यवस्थापन, रोग व कीड व्यवस्थापन, डाळिंब लागवड व प्रक्रियेशी संबंधीत विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रकाश मोरे यांनी तर आभार डॉ. अजय हजारे यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी कानडगाव, तांभेरे व पाथर्डी तालुक्यातील कौडगाव येथील २५ डाळिंब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## राष्ट्रीय शेतकरी दिन शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर संपन्न

**दि. २३ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत तांभेरे, कानडगाव ता. राहुरी येथील शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा करण्यात आला. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख उपस्थित होते. शेतकरी दिनाचे औचित्य साधून तांभेरे (ता. राहुरी) येथील तरुण व प्रयोगशील शेतकरी ऋतिक गागरे यांच्या नैसर्गिक शेती फार्मिंग प्लॉटला मान्यवरांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी ऋतिक गागरे यांनी स्वतः तयार केलेल्या जैविक स्लरी, बीजामृत, जीवामृत, घन जीवामृत, दशपर्णी अर्क, ब्रह्मास्त्र व अग्निअस्त्र यांचा प्रत्यक्ष वापर कसा केला जातो याची सविस्तर माहिती दिली. यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे यांनी ऋतिक गागरे यांच्या नैसर्गिक शेतीतील प्रयोगांचे आणि अंमलबजावणीचे कौतुक करत हा उपक्रम राज्यातील शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल असे सांगितले. यानंतर मान्यवरांनी मौजे कानडगाव

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





येथील पंकज लोंढे व बाबासाहेब लोंढे यांच्या डाळींब प्रात्यक्षिक व प्रतिक मदन गागरे यांच्या हरभरा प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देऊन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मोजे. तांभेरे गावाचे सरपंच डॉ. उमेश मुसमाडे, मेजर ताराचंद गागरे, विजय मुसमाडे, डॉ. सुधाकर मुसमाडे, महेश गागरे, धर्मेंद्र मुसमाडे, दत्तात्रय मुसमाडे, जालिंदर मुसमाडे, सुनील गागरे व कानडगाव येथील सोपान गागरे, बाबासाहेब हारदे, तात्यासाहेब घोरपडे, साहेबराव लोंढे, ज्ञानेश्वर गागरे, प्रवीण लोंढे, सुनील लोंढे व सोन्याबापु लोंढे व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. या प्रक्षेत्र भेटीच्या आयोजनासाठी प्रकल्पाचे प्रक्षेत्र सहाय्यक श्री. राहुल कोऱ्हाळे व श्री. किरण मगर यांचे सहकार्य लाभले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जिल्हास्तरीय चर्चासत्र संपन्न




**दि. २९ डिसेंबर,२०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प आणि कालिकत (केरळ) येथील सुपारी व मसाला विकास निदेशालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या उपस्थितीत पार पडले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर येथील गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेदिक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुरजसिंग ठाकूर तसेच याच महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. अमित शिनगारे उपस्थित होते. यावेळी कृषि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, कृषि कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उत्तम कदम, कडधान्य प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुरेश दोडके, डॉ. संजय गावडे, डॉ. मुकुंद भिंगारदे, डॉ. विलास आवारी, डॉ. नंदकुमार कुटे व औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाचे प्रमुख डॉ. विक्रम जांभळे उपस्थित होते.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की मानवी आरोग्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या औषधी वनस्पतींचा उल्लेख आयुर्वेदामध्ये आहे. या औषधी वनस्पतींमध्ये जवळजवळ सर्वच आजार मुळापासून नष्ट करण्याची ताकद आहे. त्याचबरोबर सुगंधी व मसालावर्गीय पिकांचेही महत्त्व मोठे असून यामध्ये शेतकऱ्यांसाठी खूप संधी आहेत. शेतकरी बंधूंनी बाजारपेठेची मागणी लक्षात घ्यावी व औषधी, सुगंधी व मसालावर्गीय पिकांची फायदेशीर असणारी शेती करावी. यावेळी डॉ. सुरजसिंग ठाकूर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना औषधी व सुगंधी वनस्पतींचे मूल्यवर्धित उपयोग याबद्दल माहिती दिली. डॉ. अमित शिनगारे यांनी आयुर्वेदातील औषधे शेतीसाठी

नवी दिशा, डॉ. विजू अमोलिक यांनी औषधी व सुगंधी वनस्पतींमध्ये शेतकऱ्यांना संधी, डॉ. विक्रम कड यांनी हळद, आले व मिरची लागवड काढणी पश्चात तंत्रज्ञान, डॉ. संजय गावडे यांनी गवती चहा व जावा सिट्रोनेला सुधारित लागवड तंत्रज्ञान, डॉ. विक्रम जांभळे यांनी औषधी व सुगंधी वनस्पतींचे महत्त्व व उपयोग याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन डॉ. विक्रम जांभळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी १५० पेक्षा जास्त संख्येने शेतकरी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन



**दि. ११ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, डिझाईन अँड मॅन्युफॅक्टरिंग, कांचीपुरम, चेन्नई येथील डॉ. नरेंद्रन गणेशन यांचे फाउंडेशन इन कॉन्सेप्ट डिझाइन फॉर इंजिनियर्स या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे होते. याप्रसंगी व्यासपीठावर कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे व जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन विकसित भारत-२०४७, समृद्ध तसेच आत्मनिर्भर भारत आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ची उद्दिष्टे समोर ठेवून करण्यात आले होते. सदर कार्यशाळेमुळे कार्यक्षम तसेच शाश्वत अभियांत्रिकी प्रणाली निर्माण करण्यास आवश्यक असणारी कौशल्य विकसित करण्यास महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मदत होईल. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध कार्यपद्धतीद्वारे स्केचिंगचे प्रात्यक्षिक केले. उत्पादन प्रक्रियेमध्ये सर्जनशील विचारपद्धती तसेच कल्पक योजना याचे विद्यार्थांनी प्रशिक्षण घेतले. सदर कार्यशाळेमध्ये महाविद्यालयाचे ३५ विद्यार्थी तसेच १० प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यशाळेचे आयोजन डॉ. अवधूत वाळुंज यांनी केले. डॉ. प्रणव पावसे यांनी कार्यक्रमप्रसंगी आभार मानले.

## मफुकृवि, राहुरी येथे कृषि तंत्रज्ञान विभागातील पदविका अभ्यासक्रमासंदर्भात बैठक संपन्न

**दि. ५ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि तंत्रज्ञान विभागामध्ये कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्र निकेतन व माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम भारत सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणाशी सुसंगत करून नवनवीन तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करण्यासाठी कृषि विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यातील प्राचार्यांची बैठक कृषि तंत्रज्ञान विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

कृषि तंत्रज्ञान शिक्षण विभागाने मराठी माध्यमाचा दोन वर्षे कालावधीचा कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम व इंग्रजी माध्यमाचा तीन वर्षे कालावधीचा तसेच माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल करून नवनवीन तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी सर्व घटक प्राचार्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. प्रशांत बोडके मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि तंत्रज्ञान शिक्षण विभागातील नमूद तीनही अभ्यासक्रम मा. कुलगुरू महोदय यांचे मार्गदर्शनाखाली अद्ययावत करणे ही काळाची गरज आहे. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृषि क्षेत्रातील विविध पिकांच्या जाती, लागवड तंत्रज्ञान, नैसर्गिक शेती, कौशल्यपूर्ण शिक्षण देणे हा कृषि विद्यापीठांचा मूळ उद्देश आहे. राज्यातील चारही विद्यापीठांच्या समन्वयाने सदरच्या अभ्यासक्रमाचे प्रारूप अंतिम करण्यात येणार आहे. तसेच कृषि तंत्र निकेतन




इंग्रजी माध्यम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इयत्ता बारावी समकक्ष करण्यासाठी इंग्रजी माध्यमाचा अभ्यासक्रम उन्नत व अद्यावत करणेबाबतचे मार्गदर्शन यावेळी त्यांनी केले.

सदरच्या बैठकीस डॉ. रवींद्र सूर्यवंशी, डॉ. बाळासाहेब रोमाडे, कृषिविद्या विभागाचे डॉ. सचिन मगर, डॉ. योगेश पाटील, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. मनोज माळी, डॉ. संतोष नेवरे, डॉ. हेमंत जाधव, डॉ. सागर खारगे, डॉ. आशिष रासकर, डॉ. राधाकृष्ण गायकवाड, डॉ. सुरज गडाख उपस्थित होते. कृषि विद्या विभागाचे सहायक कुलसचिव श्री. हेमंत सोनार, श्री. मंदार जोशी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक तांत्रिक अधिकारी श्री. हेमचंद्र परदेशी यांनी केले. बैठक यशस्वीतेसाठी कृषि तंत्रज्ञान विभागाचे श्री. अशोक हारदे, श्री. दत्तात्रेय राजे व इतरांनी परिश्रम घेतले.

## वरवंडी–बाभुळगाव येथे जागतिक मृदा दिन संपन्न




**दि. ५ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा मृदविज्ञान विभाग, कृषि विभाग, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), मुळा–माई फार्मर्स प्रोडयुसर कंपनी, बाभुळगाव यांचे संयुक्त विद्यमाने जागतिक मृदा दिन २०२५ चे आयोजन वरवंडी–बाभुळगाव येथे करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. सुधाकर बोराळे, प्रकल्प संचालक (आत्मा) श्री. प्रदिप लाटे,प्रकल्प उपसंचालक (आत्मा) श्री. राजाराम गायकवाड, मृदविज्ञान विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, भारतीय मृदविज्ञान संस्था शाखा राहुरीच्या सचिव डॉ. रितू ठाकरे,तालुका कृषि अधिकारी श्री. बापूसाहेब शिंदे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. प्रशांत बोडके म्हणाले की जमीन सुधारणेसाठी नैसर्गिक शेतीकडे वळून जमिनीचे आरोग्य पुर्वपदावर आणणे क्रमप्राप्त आहे. शेतीयोग्य जमिनीवर शहरे वसत आहेत, जमिनीची धूप मोठया प्रमाणात होऊन मातीबरोबरच अन्नद्रव्येदेखील वाहून जात आहेत. यामुळे ओढे, नाले, नद्या यांचे प्रदुषण होत आहे. दिवसेंदिवस जमिनीतील सेंद्रिय कर्ब कमी होऊन पीक उत्पादनात घट येत आहे. बदलत्या हवामान परिस्थितीत रसायनविरहीत अन्ननिर्मिती, जमिनीची उत्पादकता पूर्व पदावर आणणे इ. आव्हाने आपल्या समोर

आहेत. नैसर्गिक शेती या समस्यांवर उपाय ठरु शकतो. डॉ. भीमराव कांबळे मार्गदर्शन करताना म्हणाले महात्मा फुले कृषि विद्यापीठ ही शेतकऱ्यांची पंढरी आहे. शेतकऱ्यांनी कायम विद्यापीठाच्या संपर्कात राहून आपला जास्तीत जास्त फायदा करुन घ्यावा. आपल्या जमिनीचे आरोग्य चांगले राहण्यासाठी प्रयत्न करावे व विद्यापीठातील शास्त्रज्ञ व संशोधकांची मदत घ्यावी. श्री सुधाकर बोराळे मार्गदर्शन करताना म्हणाले सेंद्रिय कर्ब हा जमिनीचा आत्मा आहे. जमिनीमध्ये मुळांभोवती सूक्ष्म जीवाणूंचे संवर्धन करा, जमिनीचे आरोग्य वाढवा. कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि कृषि विद्यापीठांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी उपयुक्त महाविस्तार मोबाईल ॲप प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या भ्रमणध्वनीमध्ये घेऊन त्याचा वापर करण्याविषयी माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

यावेळी जेष्ठ मृदशास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे, श्री. प्रदिप लाटे, श्री. दिगंबर अडसुरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी श्री. भाऊसाहेब कोळेकर, सरपंच, वरवंडी, श्री. गोरक्षनाथ गिऱ्हे, सरपंच, बाभूळगाव, श्री. शरद ढगे, तंटामुक्ती अध्यक्ष, वरवंडी, प्रा. गंगाधर चिंधे, अध्यक्ष, शेतकरी उत्पादक कंपनी फेडरेशन, श्री. पोपट मोरे, संचालक, श्री. गोरक्षनाथ अडसुरे, मुळा–माई शेतकरी उत्पादक कंपनी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रितू ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर अभारी श्री. बापूसाहेब शिंदे यांनी मानले. कार्यक्रमासाठी शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

## अविष्कार संशोधन स्पर्धा– २०२५ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे उल्लेखनीय यश



**दि. ८ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन अविष्कार संशोधन स्पर्धा– २०२५ या बारामती येथील डॉ. शरदचंद्र पवार कृषि व संलग्न महाविद्यालयात दि. ५–६ डिसेंबर रोजी संपन्न झाल्या. या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पदव्युत्तर महाविद्यालय संघाने उल्लेखनीय यश मिळविले. या संघाला चार बक्षिसे मिळाली. या स्पर्धेमध्ये ३७ कृषि महाविद्यालयातील २३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कृषि व पशुसंवर्धन श्रेणीत पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये कु. श्रेया पाचपिले हिने प्रथम पारितोषिक तसेच चि. प्रशांत राऊत याने द्वितीय पारितोषिक मिळविले. आचार्य पदवी विद्यार्थ्यांमध्ये कु. स्नेहल साठे हिने वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा या श्रेणीत प्रथम पारितोषिक तसेच चि. अनिरुद्ध बर्वे याने कृषि व पशुसंवर्धन श्रेणीत प्रथम पारितोषिक मिळविले. या पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे संपन्न होणाऱ्या १८ व्या महाराष्ट्र राज्य आंतर–विद्यापीठ अविष्कार संशोधन स्पर्धा–२०२५ (संशोधन अधिवेशन) साठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. विद्यापीठाच्या या संघाला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विद्यार्थी कल्याण तसेच क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, संघ व्यवस्थापक डॉ. अधिर आहेर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

## कृषि विद्यापीठातील मेंढी सुधार प्रकल्प आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कोळेवाडी येथे मेंढ्यांचे जंत निर्मुलन शिबीर संपन्न

**दि. १२ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील सर्वसमावेशक मेंढी सुधार प्रकल्प, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग आणि रोटरी क्लब, राहुरी यांचे संयुक्त विद्यमाने कोळेवाडी, ता. राहुरी येथे मेंढ्यांचे जंत निर्मूलन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरचा कार्यक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व पशुसंवर्धन व

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी




दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. मेंढीच्या जमिनीलगत चरण्याच्या सवयीमुळे जंताची बाधा होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे मेंढीला जंत निर्मुलन करणे आवश्यक असते. जंतनाशक निवडताना मेंढीची लेंडी तपासणी करून योग्य ते जंतनाशक निवडल्यास परिणाम अधिक दिसून येतो अशी माहिती विभाग प्रमुखांनी दिली.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब, राहुरी सेन्ट्रलचे अध्यक्ष श्री. अविनाश साबरे, सचिव डॉ. जयंत कुलकर्णी, डॉ. विक्रम कड यांनी रोटरी क्लबच्या आर्थिक सहकार्यातून प्रभावी जंतनाशकाचा पुरवठा केला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र निमसे आणि मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे इंटर्नशिपचे विद्यार्थी यांनी जंत निर्मुलन कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी २००० मेंढ्या आणि शेळ्यांचे जंत निर्मुलन करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यापीठातील डॉ. चांगदेव वायाळ आणि कोळेवाडी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांची शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर भेट




**दि. १७ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रातील शास्त्रज्ञांची शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर भेट आयोजित करण्यात आली होती. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विषयाचे विषयतज्ञ डॉ. सुनील अडांगळे, उद्यानविद्या विषयतज्ञ डॉ. अन्सारखान आतार व पदव्युत्तर महाविद्यालयातील विस्तार विभागाचे डॉ. बाबासाहेब भिंगारदे यांचा या चमुमध्ये समावेश होता.

भारतीय कृषि संशोधन संस्था, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून गहू पीक प्रात्यक्षिक प्लॉट मानोरी ता. राहुरी येथील शेतकऱ्यांना देण्यात आले होते. या पीक प्रात्यक्षिक प्लॉटची पाहणी या शास्त्रज्ञांनी केली. यावेळी श्री. शिवाजी थोरात यांच्या गहू, हरभरा प्लॉट तसेच एकात्मिक शेतीच्या माध्यमातून पशुधन तसेच कोंबडीपालन व त्यांच्या प्रक्षेत्राला भेट देवून मार्गदर्शन केले. श्री. शंकर सकपाळ रा. मानोरी, ता. राहुरी यांच्या मुक्त गोठा व गांडुळखत प्रकल्पाला भेट देवून मार्गदर्शन करण्यात आले. मानोरी येथील डॉ. दत्तात्रय वने यांनी स्थापन केलेल्या दीपस्तंभ शेतकरी फार्मर प्रोडूसर कंपनीला भेट देण्यात आली.

## श्रीगोंदा येथे नाचणी लागवड शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न




**दि. २१ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील राष्ट्रीय कृषि विकास योजना, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व पोळ ॲग्रो सर्विसेस, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगोंदा येथे नाचणी लागवड शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणुन श्रीगोंदा येथील तालुका कृषि अधिकारी श्रीमती क्रांती चौधरी उपस्थित होत्या. यावेळी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विषयाचे विशेषज्ञ डॉ. सुनील अडांगळे, कोल्हापूर येथील नाचणी सुधार प्रकल्पाचे कनिष्ठ पैदासकार डॉ. योगेश बन व पोळ ॲग्रो सर्व्हिसेसचे श्री. राहुल पोळ उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. आनंद चवई म्हणाले की भरडधान्याचे महत्व व पोषणमूल्य लक्षात घेता शेतकरी बचत गटांनी प्रयोगशील बनणे गरजेचे आहे. हरितक्रांती झाली परंतु रासायनिक खते व किटकनाशकांचा भरमसाठ वापर यामुळे मानवी आरोग्य धोक्यात आहे. यासाठी मानवी आरोग्याला पोषक असणारे भरड धान्य म्हणजे नाचणी, राळा अशा पिकांची गरज आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करतांना श्रीमती क्रांती चौधरी म्हणाल्या की फार्मर ग्रुपवर आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती वाढवावी. सध्या नाचणीच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे त्यामुळे विक्रीसाठी बाजारपेठ सहज उपलब्ध होईल असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील अडांगळे यांनी केले. यावेळी डॉ. योगेश बन यांनी नाचणी व पौष्टिक तृणधान्य पिके, ओळख, आहारातील व लागवडीचे महत्व, शाश्वत शेती पर्याय याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील अडांगळे यांनी तर आभार श्री. राहुल पोळ यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ४० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर भेटी





**दि. २२ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे मृदविज्ञान विभागांतर्गत शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची स्थापना झालेली आहे.

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या प्रेरणेने व मृदविज्ञान विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर तालुक्यात असलेल्या बेलापूर, पढेगाव व कान्हेगाव तसेच राहुरी तालुक्यातील मानोरी या गावातील विविध शेतकऱ्यांशी संपर्क व त्यांच्याशी शास्त्रीय दृष्टीने विचारमंथन करण्याकरिता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन मार्गदर्शन करण्यात आले. मृदविज्ञान विभागाद्वारे स्थापन झालेल्या शेतकरी शास्त्रज्ञ मंचाद्वारे प्रामुख्याने माती परीक्षण जागृकता त्याअंतर्गत विद्यापीठातील विविध प्रकाशने, माती परीक्षण व पीक प्रतिसादानुसार समीकरण शिफारशी या सर्व बाबी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या जातात. यावेळी झालेल्या कार्यक्रमामध्ये मृदरसायन शास्त्रज्ञ तथा अंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांच्याशी चर्चा करून शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या शेतकऱ्यांना माती परीक्षणानुसार खत व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहाय्यक प्राध्यापक डॉ. क्रांती पाटील, वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. शुभांगी कदम व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

## कृषि विद्यापीठातील हॉर्टसॅपमधील तज्ञांचा आंबा पिकावर लीफ मायनरच्या वाढत्या प्रादुर्भावावर शेतकऱ्यांना सल्ला




**दि. २६ डिसेंबर, २०२५.** महाराष्ट्रातील आंबा पट्ट्यात गेल्या काही दिवसांत लीफ मायनर या कीडीचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढताना दिसत आहे. काजू पिकाची प्रमुख कीड म्हणून ओळखली जाणारी ही कीड आता आंबा पिकावरही नुकसानकारक ठरत असल्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. बदलत्या हवामानामुळे विविध किडींच्या वर्तनात आणि यजमान पिकांच्या निवडीत होणारे बदल हा या नव्या परिस्थितीचा मुख्य घटक असल्याचे त्यांनी सांगितले. पावसाळा आणि नंतरच्या दमट हवामानामुळे आंब्याच्या कोवळ्या पानांवर या किडीचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. राहुरी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या पथकाला अहमदनगर, सोलापूर तसेच पुणे व रत्नागिरी जिल्ह्यातील विविध भागांतून या किडीचे नमुने प्राप्त झाले आहेत.

अक्रोसेरकॉप्स सिंग्राम्मा या शास्त्रीय नावाने ओळखली जाणारी ही कीड आंबा, काजू आणि जांभूळ या पिकांवर आढळते. या अळीची अंडी अतिशय लहान, पारदर्शक व चिकट असून ती कोवळ्या पानांच्या वरच्या बाजूस घातली जातात. एका मादीकडून ३६–३८ अंडी दिली जातात. ५–७ दिवसांत त्यातून अळी बाहेर येते. या अळ्या पानांच्या उतींमध्ये सुरुंग तयार करून आतमध्येच भक्षण करतात. अळी अवस्था साधारण १०–१५ दिवस टिकते. या अळीची कोषावस्था बहुतेक वेळा जमिनीत पूर्ण होते. काहीवेळा पानांच्या घडीतही कोष तयार होतो. त्याचा कालावधी ७–९ दिवस असतो. अंड्यातून बाहेर पडताच अळी पानांच्या वरच्या त्वचेच्या थरात खाण्यास सुरू करते. त्यामुळे पानांच्या पृष्ठभागावर वेड्यावाकड्या, वळणदार खुणा दिसू लागतात. नंतर या भागात ब्लिस्टरसारखी फोडसदृश सूज तयार होते. हे भाग वाळल्यानंतर पानं करडी–तपकिरी पडुन वाकडीतिकडी होतात व छिद्रे दिसू लागतात. लहान रोपांवर प्रादुर्भावाचे प्रमाण तुलनेने जास्त असून एका पानावर १ ते ५ अळ्या दिसतात. नुकसानीमुळे कोवळी पाने कायमची खराब होऊन अकाली गळून पडतात. या अळीच्या नियंत्रणासाठी राहुरी विद्यापीठातील वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख तथा हॉर्टसॅप योजनेचे प्रमुख डॉ. रविंद्र गायकवाड तसेच प्रकल्प समन्वयक डॉ. संजय कोळसे, संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे आणि कीटकशास्त्र विभागातील डॉ. सखाराम आघाव यांनी शेतकऱ्यांना पुढील उपाय तातडीने राबवण्याचे आवाहन केले आहे. प्रादुर्भावग्रस्त कोवळी पाने व अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. किडीची कोष अवस्था जमिनीत असल्यामुळे खाली पडलेला पालापाचोळा साफ करून जमिनीची मशागत करावी, जेणेकरून कोष बाहेर येऊन उन्हामुळे नष्ट

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

डिसेंबर २०२५

होतील. चिलोनस प्रजाती, सिम्पायसिस प्रजाती, क्रायसोचारिस नेफेरियस, ग्रीन लेसविंग यांसारख्या मित्रकिटकांचे संवर्धन करावे. नियमित निरीक्षण ठेवून प्रादुर्भाव प्रारंभीच ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. लीफ मायनर ही कीड आंबा पिकावर दुय्यम मानली जात असली तरी सध्या हवामानातील बदलामुळे तिचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेवर निरीक्षण व योग्य व्यवस्थापन उपाययोजना राबवणे अत्यंत गरजेचे आहे असे विद्यापीठातील तज्ज्ञांनी आवाहन केले.

## राहुरी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे डाळिंब पिकावर मार्गदर्शन



**दि. १ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व वनस्पती रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग राबविण्यात येणाऱ्या हॉर्टसॅप प्रकल्पामार्फत अहिल्यानगर जिल्ह्यातील काळे आखाडा (ता. राहुरी) येथे डाळिंब पीक रोग संकेत पातळीच्या वर गेलेल्या बागेला विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी भेटी दिल्या. या चमूमध्ये अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके योजनेचे कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे, वनस्पती रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभागातील हॉर्टसॅप प्रकल्पाचे संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे, तालुका कृषि अधिकारी श्री. बापुसाहेब शिंदे, मंडल कृषि अधिकारी श्री. अशोक गिरगुणे व कृषि सहाय्यक श्री. म्हस्के उपस्थित होते.

या भेटी दरम्यान शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर जाऊन डाळींब उत्पादक शेतकऱ्यांबरोबर सविस्तर चर्चा केली. या चर्चेदरम्यान शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करुन डाळिंब पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन आणि अधिक उत्पादनासाठी सविस्तर मार्गदर्शन व घडीपत्रिकांचे वाटप केले. डाळिंब बागेची पाहणी केल्यानंतर या बागेमध्ये बुरशीजन्य ठिपके या रोगाचा प्रादुर्भाव दिसला. त्या अनुषंगाने किड एकात्मिक नियंत्रणासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. आर्थिक नुकसान पातळीच्यावर गेलेल्या गावांसाठी हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत वेळोवेळी एन. पी. एस. एस., न्यु दिल्ली या संकेतस्थळावर विद्यापीठामार्फत सदर पिकासाठी पीकसरंक्षण सल्ला दिला जातो. सदर प्रक्षेत्र भेटीचे वनस्पती रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक व हॉर्टसॅप प्रकल्पाचे समन्वयक डॉ. संजय कोळसे यांनी नियोजन केले.

## आंबा भुरी रोगाबाबत शेतकऱ्यांसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा सल्ला

**दि. २९ डिसेंबर, २०२५.** डिसेंबर व जानेवारी महिन्यात आंबा पिकाला मोहोर येण्यास सुरुवात होताच आंबा भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो असा इशारा राहुरी कृषि विद्यापीठातील वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. संजय कोळसे व डॉ. प्रवीण खैरे यांनी दिला आहे. या कालावधीत हवामान ढगाळ राहणे, रात्रीचे तापमान दिवसाच्या तुलनेत कमी असणे व दिवसा २० ते २५ अंश सेल्सिअस तापमान असल्यास भुरी रोग झपाट्याने पसरल्याचे आढळून येते. हा रोग ओयडियम मॅन्जीफेरी या बुरशीमुळे होतो. या बुरशीची बीजे वाऱ्यामार्फत पसरत असून मोहोर व कोवळ्या पालवीवर प्रथम लागण दिसून येते. सुरुवातीला मोहोराच्या दांड्याच्या टोकाजवळ पांढऱ्या रंगाची तंतूमय बुरशी दिसते व पुढे संपूर्ण मोहोरावर तिचा प्रसार होतो. बुरशी पेशीतील अन्नरस शोषून घेत असल्याने मोहोराची वाढ खुंटते. रोग तीव्र झाल्यास ७० ते ८० टक्के तर काही वेळा १०० टक्क्यांपर्यंत नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. कोवळ्या पानांवर रोग आल्यास पाने तांबूस होऊन वाळतात व गळून पडतात. फळधारणेपूर्वी रोग आल्यास फुले गळून







पडतात, तर फलधारणेनंतर रोग उद्भवल्यास फळांच्या देठांवर परिणाम होऊन फळगळ वाढते.

या भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर येण्याच्या १५ दिवस आधीच पहिली प्रतिबंधात्मक फवारणी करावी. त्यासाठी पाण्यात मिसळणारे सल्फर ८० टक्के डब्ल्यू.पी. २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. रोगाची लक्षणे दिसताच ॲझोक्सीस्ट्रोबिन २३ टक्के एस.सी. १ मिली किंवा हेक्साकोनाझोल ५ टक्के ई.सी. १ मिली प्रति लिटर पाणी यापैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची फवारणी करावी. पूर्ण वाढलेल्या झाडासाठी साधारणत: २० लिटर द्रावण आवश्यक असून, १५ दिवसांच्या अंतराने ४ ते ५ फवारण्या कराव्यात. फळधारणेनंतर फवारणीपूर्वी मोहोर स्वच्छ करून फवारणी करावी असे आवाहन करण्यात येत आहे. डिसेंबर–जानेवारी महिन्यात वेळेवर उपाययोजना न केल्यास आंबा उत्पादनावर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी सतर्क राहून शिफारसीनुसार फवारण्या करून भुरी रोगाचे योग्य व्यवस्थापन करावे असे आवाहन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी केले आहे.

## तामसवाडी येथे सुगंधी वनस्पतीविषयी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन

**दि. ९ डिसेंबर, २०२५.** नेवासा तालुक्यातील तामसवाडी येथे शेतकऱ्यांसाठी सुगंधी वनस्पतींची लागवड या विषयावर महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील शास्त्रज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलीक, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. विक्रम जांभळे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. चंद्रकांत जगताप होते. यावेळी डॉ. विजू आमोलिक मार्गदर्शन करताना म्हणाले की शेतकऱ्यांनी शेतीविषयक उत्पादन वाढीसाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. शेतकऱ्यांनी सुगंधी वनस्पतींची लागवड करावी जेणेकरून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. याप्रसंगी डॉ. विक्रम जांभळे यांनी सुगंधी वनस्पती तसेच त्यापासून शेतकऱ्यांना मिळणारे फायदे त्याचबरोबर ज्वारी, बाजरी, नागली या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. उसाच्या फुले–१५००६, फुले–१५०१२, फुले–१५०८१ व फुले–१३००७ या नवीन जाती क्षारयुक्त पाणी असले तरी चांगले उत्पादन देतात असे यावेळी त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. बाळासाहेब नवगिरे यांनी तर आभार श्री. संदीप कोलते यांनी मानले. यावेळी श्री. बाबासाहेब फोपसे, श्री. दत्तात्रय फोपसे, श्री. बबनराव कोलते, श्री.संदीप कोलते, श्री. एकनाथ कर्जुले, श्री. कचरू कर्जुले, श्री. निवृत्ती कर्जुले, श्री. भाऊराव फोपसे,श्री. अमोल संसारे, श्री. विशाल निमसे, श्री. रमेश खेमनर, श्री. रावजी पठारे तसेच इतर शेतकरी बांधव उपस्थित होते.

## सातारा जिल्ह्यातील शेळकेवाडी येथे जमीन आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रम संपन्न





**दि.  डिसेंबर,२०२५.** कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा जिल्ह्यातील शेळकेवाडी येथे जागतिक मृदा दिनानिमित्त जमीन आरोग्य पत्रिकांचे वितरण व त्यांचे विश्लेषण या संदर्भात चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. प्रकाश चव्हाण उपस्थित होते. यावेळी श्री. प्रवीण नलावडे यांनी महाविस्तार एआय ॲपची माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी श्री. प्रवीण शेळके यांच्या ऊस पिकांमध्ये सेंद्रिय खत वापराबाबत कृती प्रात्यक्षिक घेण्यात आली. मान्यवरांनी यावेळी ज्वारी प्रकल्प व धाडसी महिला गटाच्या ऊस सुपर केन रोपवाटिकेला भेट दिली.

## कृषि महाविद्यालय व तंत्र विद्यालयांचे विविध उपक्रम

### कृषि महाविद्यालय, धुळे येथे जागतिक मृदा दिन साजरा



**दि. ५ डिसेंबर, २०२५.** जागतिक मृदा दिनानिमित्त कृषि महाविद्यालय, धुळे व कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मृदा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे उपस्थित होते. यावेळी मृदविज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. विक्रांत भालेराव, कृषि विज्ञान केंद्राचे मृदाशास्त्रज्ञ डॉ. अतिश पाटील, डॉ. प्रसाद मरगळ, डॉ. निहाल तितरमारे उपस्थित होते.

यावेळी डॉ. बबनराव इल्हे मार्गदर्शन करताना म्हणाले की आपण आपल्या निरोगी आरोग्यासाठी जमिनीची काळजी घ्यायला हवी. रासायनिक खते आणि विविध कृषि रासायनिक निविष्ठांच्या चुकीच्या वापरामुळे जमिनीचे आरोग्य दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे विषयुक्त अन्न आपल्या वाट्याला येत आहे. आपल्या जमिनी निरोगी राहिल्या तरच आपण निरोगी राहू असे यावेळी ते म्हणाले. डॉ. अतिश पाटील यांनी यावेळी उपस्थितांना जमीन आरोग्य व्यवस्थापनामध्ये युवकांचा सहभाग याविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले. याप्रसंगी आपल्या प्रास्ताविकात डॉ. विक्रांत भालेराव म्हणाले की दरवर्षी जागतिक मृदा दिवस हा विविध संकल्पनेवर साजरा केला जातो. या वर्षाचा जागतिक मृदा दिवस हा

निरोगी शहरांसाठी निरोगी माती या संकल्पनेवर साजरा केला जात आहे. यावेळी मान्यवरांनी कृषि माहिती तंत्रज्ञान केंद्र, गांडूळ खत निर्मिती युनिट आणि नैसर्गिक शेती प्रकल्पाला भेट दिली.

## कृषि विज्ञान संकुल, काष्टी, मालेगाव येथे जागतिक मृदा दिन साजरा





**दि. ५ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनानुसार मालेगाव तालुक्यातील काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल येथे मृद विज्ञान विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मृदा दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संकुलाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार नांदगुडे होते. याप्रसंगी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. विवेक कानवडे, मृदा शास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. योगेश पाटील, तालुका कृषि अधिकारी श्री. भगवान गोरडे, तंत्र अधिकारी श्री. संतोष गाढे, प्राध्यापक डॉ. सोमनाथ सोनवणे, शेतकरी श्री. रवींद्र खैरनार उपस्थित होते.

यावेळी डॉ. सचिन नांदुगडे यांनी मातीचे आरोग्य सांभाळणे आणि तिचे ऋण फेडणे आवश्यक असल्याचे आपल्या मार्गदर्शनात सांगितले. याप्रसंगी डॉ. योगेश पाटील जमीन आरोग्य व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की सद्यस्थितीत शेतजमिनी मोठ्या प्रमाणात दूध प्रदूषित होत आहेत. अतिवृष्टी मुळे जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होत असून सुपीक माती शेतातून वाहून जात आहे. जमिनीचा होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी उपाययोजना आणि जमिनीचे आरोग्य आणि सुपीकता वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा कार्यक्षम वापर आवश्यक आहे. सेंद्रिय घटकांचा वापर वाढवावा, पिकांचे अवशेष जमिनीत गाडून कुजवावेत आणि जिवाणू संवर्धकांचा वापर करावा असे यावेळी ते म्हणाले. कीटकशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संजय पाटील यांनी जिवाणू खते व जैविक कीडनाशके यांचे महत्त्व व वापर, श्री. गोरडे यांनी महाविस्तार ए आय अँप, पीक विमा योजना, रब्बी हंगाम स्पर्धा योजना याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रक्षेत्रावर मृदाशास्त्र विभागाचे सहाय्यक डॉ. प्रणिती सोनवणे व डॉ. जयश्री कडू यांनी माती नमुने घेण्याबाबत प्रात्यक्षिक करून दाखवले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.प्रकाश तापकीर यांनी प्रास्ताविक करताना मृदा दिनाचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमासाठी विद्याशाखा प्रमुख डॉ. दिनेश बिरारी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राहुल खुळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रशांत सोनवणे, सहाय्यक कुलसचिव श्री. नारायण पाठक तसेच इतर प्राध्यापक वर्ग, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच अजंग, वडेल, पिंपळगाव, वडगाव, रावळगाव, पाडळदे परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमृत खैरे यांनी तर आभार डॉ. उदय पवार यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन मौ.अजंग येथे उत्साहात संपन्न

**दि. १८ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली तसेच छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि महाविद्यालय, शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय, शासकीय अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय आणि शासकीय कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककांद्वारे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन मौजे अजंग ता. मालेगाव, जि. नाशिक येथे १८ डिसेंबर ते २४ डिसेंबर, २०२५ यादरम्यान आयोजीत करण्यात आले





होते. या संस्कार शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे होते. यावेळी सरपंच श्री. तेजस अहिरे, उपसरपंच सौ. रोशनी सूर्यवंशी, सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री. हेमंत अहिरे, शाळा समितीचे अध्यक्ष श्री. योगेश अहिरे, श्री. गोकुळ सूर्यवंशी, विद्यार्थी परिषदेचे डॉ. सोमनाथ सोनवणे, जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा अजंगच्या मुख्याध्यापिका सौ. उशा किरण शेलार आणि ग्रामविस्तार अधिकारी डॉ. गोकुळ खैरनार उपस्थित होते. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. नांदुगडे यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या २०२५-२६ या वर्षाची संकल्पना शाश्वत पाणलोट विकासामध्ये युवकांचे योगदान महत्त्वाचे असून नवकल्पना, जनजागृती, श्रमदान आणि तंत्रज्ञानाच्या वापरातून ते जलसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाला चालना देतात असे सांगितले. विस्तार कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राहुल खुळे यांनी केले. या कार्यक्रमास संकुलाचे कुलमंत्री डॉ. संजय पाटील, डॉ. योगेश पाटील, डॉ. दिनेश बिरारी, डॉ. प्रशांत सोनवणे, श्री. नारायण पाठक इतर अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कोमल पाटील, कु. वैष्णवी कातकडे यांनी तर आभार प्रदर्शन कु. यशश्री काळे यांनी केले.

## कसबा बावड्यात जागतिक मृदा दिन कार्यक्रमाचे आयोजन





**दि. ५ डिसेंबर, २०२५.** विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर अंतर्गत कसबा बावडा प्रक्षेत्रावर जागतिक मृदा दिन आयोजित करण्यात आला होता. यावेळी मका संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. सुनील कराड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी कृषि उपसंचालक श्री. तानाजी पाटील, श्री. चांगदेव गायकवाड व श्रीमती मयुरा काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कृषि मृद संधारण व माती तपासणी कार्यालयाचे श्री. वडे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी डॉ. सुनील कराड मार्गदर्शन करताना म्हणाले की शेतकरी अधिक उत्पादनासाठी शिफारशीत मात्रेपेक्षा जास्त खतांचा वापर करतात. यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता घटते. भविष्यातील पिढीसाठी जमिनीचा शाश्वत विकास करणे आवश्यक आहे. शाश्वत पीक उत्पादनासाठी जमिनीचे आरोग्य टिकवणे आवश्यक आहे. यावेळी विभागीय कृषि संशोधन

केंद्राचे मृदाशास्त्रज्ञ डॉ. प्रवीण गजभिये यांनी महाराष्ट्रातील जमीन प्रकार, जमिनीचे महत्व व जमिनीचे आरोग्य यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुहास भिंगारदेवे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. सागर शेळके यांनी तर आभार प्रा. शैलेंद्र वाळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शेतकरी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयात मृदा दिन उत्साहात साजरा



**दि. ५ डिसेंबर, २०२५.** कोल्हापूर येथील राज्यर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात मृदा विज्ञान विभागातर्फे आरोग्यदायी शहरासाठी निरोगी माती या संकल्पनेवर आधारित जागतिक मृदा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश कांबळे होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक डॉ. रावसाहेब पवार, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. बी. टी. कोलगणे, सहाय्यक कुलसचिव श्री. उत्तम गाताडे उपस्थित होते. यावेळी डॉ. शैलेश कांबळे यांनी मातीचे आरोग्य जपल्यास आपले जीवन समृद्ध होते असे सांगितले. डॉ. रावसाहेब पवार यांनी जमिनीचे आरोग्य बिघडण्याची कारणे आणि शाश्वत सुधारणा उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी मृदा विज्ञान विभाग प्रमुख डॉ. आनंद जाधव यांनी जमिनीचे आरोग्य सुधारले तर मानवाचे आरोग्य व विचारशक्ती सुधारते असे सांगून सेंद्रिय कर्बाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय नाळे यांनी तर आभार डॉ. दीपक पोद्दार यांनी मानले. यावेळी विविध विभागाचे प्रमुख, कर्मचारी,विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे १२ व्या जागतिक मृदा दिनाचे अयोजन






**दि. ५ डिसेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे १२ व्या जागतिक मृदा दिनानिमित्त निरोगी माती निरोगी शहरे या संकल्पनेवर आधारित मातीचे शाश्वत व्यवस्थापन, माती परीक्षणाचे महत्व व माती नमुना पद्धत प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे

आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी प्रा. पोपट पवार, डॉ. मनोज गुड, डॉ. अनिकेत गायकवाड, श्री. संजय आढाव, प्रगतशील शेतकरी श्री. शरद ढवळे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. दत्तात्रय सोनवणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की दरवर्षी मातीचे महत्व व गुणवत्तेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जगभरात ०५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिन साजरा केला जातो. शेतीमध्ये मृदेच्या आरोग्याला अनन्यसाधारण महत्व आहे. मानवी आरोग्याची जशी तपासणी केली जाते तशीच शेतीमध्ये मातीच्या आरोग्याचीदेखील तपासणी माती परीक्षणाद्वारे करणे गरजेचे आहे. यावर्षी झालेल्या पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनींची धूप झाली. अतिवृष्टीमुळे होणारी मातीची धूप थांबवली पाहिजे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने मातीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी विविध उत्पादने विकसित केली आहेत. ज्याद्वारे पिकांचे अवशेष कुजवून अन्नद्रव्यांची उपलब्धता मुबलक प्रमाणात होते. शेतकरी बांधवांनी ही उत्पादने वापरावीत असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी डॉ. अनिकेत गायकवाड यांनी माती परीक्षणाचे महत्व व माती नमुना पद्धत प्रात्यक्षिक सादर केले. कृषि पदवीच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थी कुमारी श्रुती काळे व कुमार हर्षल काकडे यांनी आपल्या मनोगतातून जागतिक मृदा दिनाचे महत्व विषद केले. प्रगतशील शेतकरी श्री. शरद ढवळे, हाळगाव यांनी शेतकरी उपयुक्त कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले. चतुर्थ वर्षातील विद्यार्थिनींनी सुबक रांगोळीद्वारे भारतातील मृदांचा नकाशा रेखाटून माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रणाली ठाकरे यांनी केले. सूत्रसंचालन कु. अनुजा जाधव व कु. नम्रता कदम यांनी तर आभार डॉ. संदीप मोरे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगावच्या खेळाडूने आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात केले राहुरी कृषि विद्यापीठाचे प्रतिनिधित्व



**दि. ८ डिसेंबर, २०२५.** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दि. ०४ ते ०८ डिसेंबर, २०२५ या कालावधीत झालेल्या अश्वमेध २७ व्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कबड्डी संघामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील कृषि पदवीच्या तृतीय वर्षात शिकत असलेल्या कु. ज्ञानेश्वरी महेंद्र गायके या विद्यार्थिनीने राहुरी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. तसेच, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. प्रशांत सावंत यांनी राहुरी विद्यापीठाच्या मुलांच्या व मुलींच्या खो–खो संघाचे संघ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. या क्रीडा महोत्सवात महाराष्ट्रातील एकूण २४ विद्यापीठांतील खेळाडूंनी सहभाग नोंदवून निरनिराळ्या क्रीडा प्रकारांत आपले गुणप्रदर्शन दाखवले. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी या निवडीबद्दल खेळाडू व मार्गदर्शक डॉ. प्रशांत सावंत यांचे कौतुक केले. आपल्या महाविद्यालयातील खेळाडू व संघ मार्गदर्शक यांची क्रीडा महोत्सवात झालेली निवड ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे, विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. प्रेरणा भोसले, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. प्रशांत सावंत व समुपदेशक प्रा. अर्चना महाजन यांनी प्रोत्साहन दिले व मार्गदर्शन केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी





**दि. ८ डिसेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत श्री संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे उपस्थित होते. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी संताजी जगनाडे महाराज हे वारकरी संप्रदायातील एक प्रमुख संत आणि कवी तसेच तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यांपैकी एक, तुकाराम महाराजांचे निकटचे शिष्य अशी ओळख उपस्थितांना करून दिली. तुकाराम महाराजांच्या अभंगांचे लेखन करण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या अभंगांमध्ये भक्ती, करुणा आणि सामाजिक समानतेचा संदेश आहे असे स्पष्ट केले. स्वयंसेवक कु. दीक्षा अनभुलेने संताजी जगनाडे महाराज यांच्या कार्यावर मनोगतातून प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रीती कवळे हिने तर आभार कु. नम्रता कदम यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, हाळगावमार्फत डाळिंब व केळी पिकावरील रोग व कीड व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न



**दि. १८ डिसेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव व तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हॉर्टसॅप/क्रॉपसॅप अंतर्गत आयोजित डाळिंब व केळी फळ पिकावरील रोग व कीड व्यवस्थापन या विषयावर श्रीगोंदा/कर्जत/जामखेड तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी व फिक्स प्लॉट धारक शेतकरी यांना प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणात महाविद्यालयातील वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. किरण चौधरी यांनी डाळिंब व केळी फळ पिकावरील रोग व्यवस्थापन, कृषि कीटकशास्त्रज्ञ डॉ. धनेश्वर पाटील यांनी डाळिंब व केळी फळ पिकावरील कीड व्यवस्थापन व उद्यानविद्याचे डॉ. संदीप मोरे यांनी फळबाग व्यवस्थापन या विषयांबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील एकूण ५३ अधिकारी, कर्मचारी व फिक्स प्लॉटधारक शेतकरी उपस्थित होते. शेवटी, पीक संरक्षण व व्यवस्थापनासंदर्भात उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन महाविद्यालयातील तज्ज्ञांनी केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी



**दि. २५ डिसेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची १०१ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. स्वयंसेवक कु. पल्लवी बोरकर, कु. लक्ष्मी जाधव, कु. श्रावणी पिंपळे व चि. अभिमन्यु ढुस यांनी आपल्या मनोगतातून एक कुशल राजकारणी, पत्रकार, कवी व लेखक अशी त्यांची ओळख पटवून दिली. मा. अटल बिहारी वाजपेयी यांच्या देशहितार्थ, समाजसेवार्थ कार्यावर व राष्ट्रपरिवर्तनार्थ योगदानावर प्रकाश टाकला. तसेच पोखरण–२ अणुचाचणी, कारगिल युद्ध, सुवर्ण चतुर्भुज योजना, सर्व शिक्षा अभियान आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे असे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अक्षदा कानडे यांनी केले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे वीर बाल दिवस साजरा



**दि. २६ डिसेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात गुरु गोविंद सिंग यांच्या साहिबजादे जोरावर सिंग आणि फतेह सिंग यांच्या प्रतिमेस सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. स्वयंसेवक कु. क्रांती चटाले व कु. फिजा सय्यद यांनी वीर बाल दिवस हा शीख धर्माचे दहावे गुरु गुरु गोविंद सिंग यांच्या दोन लहान मुलांच्या, साहेबजादा जोरावर सिंग आणि साहेबजादा फतेह सिंग यांच्या अजोड शौर्य आणि बलिदानाची आठवण म्हणून साजरा होतो असे सांगितले. या बालकांनी धर्माच्या रक्षणासाठी व आपल्या मूल्यांसाठी वयाच्या अवघ्या ९ आणि ६ व्या वर्षी मुघलांसमोर झुकण्यास नकार दिला आणि भिंतीमध्ये जिवंत गाडले गेले. त्यांच्या या बलिदानाचे स्मरण व त्यांच्या बलिदानामुळे समाजाला देशभक्ती, शिस्त आणि देशासाठी असलेल्या बांधिलकीची भावना जागृत करतो असे आपल्या मनोगतातून स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अक्षदा कानडे यांनी केले.

वर्ष :५, अंक क्र. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी



**दि. २७ डिसेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भाऊसाहेब उर्फ डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२७ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. स्वयंसेवक कु. श्रुती काळे, कु. मृणालिनी सरोटे, कु. तेजस्विनी गळवे व कु. शिवानी लाटे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांची स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री व भारतीय कृषि क्रांतीचे अग्रदूत म्हणून असलेली ओळख पटवून दिली. विदर्भात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था काढली, शेतकऱ्यांचे आयुष्य समृद्ध करण्यासाठी भारत कृषक समाजाची स्थापना केली, अमरावती अंबाबाई मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे म्हणून सत्याग्रह केला अशी समाजहितार्थ कार्याची माहिती मनोगतातून दिली. कृषि क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्रातील प्रादेशिक समतोल साधत केलेल्या कृषि विद्यापीठाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात आले असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अक्षदा कानडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्राचे उद्घाटन संपन्न



**दि. १९ डिसेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागांतर्गत अनुभवाधिष्ठित शिक्षणांतर्गत दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्राचे उद्घाटन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यु. बी. होले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. आर. बी. शेंडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. डी.बी. सूर्यवंशी, सहाय्यक कुलसचिव प्रा. एस. डी. पाटोळे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. यु.बी. होले म्हणाले की विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय उभा करावा. त्यासाठी त्यांना या अनुभवाधिष्ठित शिक्षणामुळे मोठ्या संधी मिळणार आहेत. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## धुळे येथील कृषि विज्ञान केंद्रात किसान सन्मान दिवस संपन्न





**दि. २३ डिसेंबर, २०२५.** धुळे येथील कृषि विज्ञान केंद्रामध्ये कृषि विज्ञान केंद्र, आत्मा, धुळे तसेच लुपिन फाउंडेशन, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय किसान सन्मान दिवस २०२५ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे प्रभारी कार्यक्रम समन्वयक डॉ. पंकज पाटील, कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ श्रीमती अमृता राऊत, प्रा. जगदीश काथेपुरी, डॉ. अतिश पाटील उपस्थित होते. यावेळी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे संपूर्ण भारतातील ७३१ कृषि विज्ञान केंद्रांमध्ये उपस्थित असलेल्या शेतकरी बांधवांशी संवाद साधला. यावेळी डॉ. अतिश पाटील यांनी शेतकऱ्यांना शाश्वत शेतीसाठी जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर असलेला गांडूळ खत प्रकल्प दाखवून गांडूळ खत निर्मितीचे प्रात्यक्षिक यावेळी दाखविण्यात आले. श्रीमती राऊत यांनी बीव्ही जी राम जी कायद्याविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली. कृषि विज्ञान केंद्रात झालेल्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेअंतर्गत क्षमताबांधणी प्रशिक्षणातील लाभार्थी प्रशिक्षणार्थींना डॉ. बबनराव ईल्हे यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. डॉ. पंकज पाटील यांनी राष्ट्रीय किसान सन्मान दिवस साजरा करण्याचा उद्देश स्पष्ट केला. प्रा. जगदीश काथेपुरी यांनी सूत्रसंचालन तर श्रीमती प्राची काळे यांनी आभार मानले.

## कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे राष्ट्रीय किसान दिवस उत्साहात साजरा



**दि. २३ डिसेंबर २०२५.** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे राष्ट्रीय किसान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश कांबळे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून चिंचवाड येथील प्रगतशील शेतकरी श्री. शांतीलाल पाटील, डॉ. शैलेश कांबळे, यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे व विद्यार्थ्यांनी कृषि पदवीनंतर कृषि आधारित स्वयंरोजगार स्थापन करून इतरांना रोजगार द्यावा या बदल मार्गदर्शन केले. श्री. पाटील यांनी आपल्या भाषणातून आपली  यशोगाथा आपल्यासमोर मांडली. या मध्ये त्यांनी शैक्षणिक, सामाजिक कृषि आशा विविध क्षेत्रामध्ये उलेखनीय

कार्य केले त्यामध्ये शैक्षणिक संस्था स्थापन करणे, विविध पतसंस्था निर्मिती, उपलब्ध फळापासून प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करणे, ऊसाची रोये तयार करणे व विक्री, रोपवाटिका निर्मिती अशा अनेक पद्धतीने केवळ शेतकरी म्हणून नाही तर एक अस्ष्टपैलू नेतृत्व आपणासमोर मांडले तसेच प्रत्येकानी नेहमी सातत्य चिकित्सपणे राहिले तरच आपले ध्येय गाठता येईल.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय स्वयंसेवक ओमकार सरपणे तर प्रस्तावना कु. सानिका शिंदे यानी केले. आभारप्रदर्शन वेदांतिका पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत भालेराव व डॉ. सचिन सातपुते यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सर्व विभागातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनी ,राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## पुणे कृषि महाविद्यालयाच्या संघाची अविष्कार संशोधन स्पर्धा २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी



**दि. ६ डिसेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील पदवीच्या संघाने डॉ. शरदचंद्र पवार कृषि व संलग्न महाविद्यालय, बारामती येथे झालेल्या अविष्कार संशोधन स्पर्धा २०२५ या स्पर्धेमध्ये सर्वाधिक पारितोषिके पटकावून महत्त्वाची कामगिरी केली आहे. सहा वेगवेगळ्या शाखांमध्ये घेण्यात आलेल्या या स्पर्धेत पुण्याच्या संघातील आठ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत पारितोषिके मिळवली. यामध्ये मानव्यशास्त्र, भाषा व ललित कला या शाखेत सिमरन सय्यद याने प्रथम क्रमांक मिळवला. वाणिज्य व्यवस्थापन व कायदा या शाखेत श्रेय शहा प्रथम क्रमांक, वैष्णव काळे तृतीय क्रमांक, शुद्ध विज्ञान शाखेमध्ये मयंक शर्मा याने प्रथम क्रमांक, कृषि आणि पशुसंवर्धन शाखेत राजेश शिंदे प्रथम क्रमांक तर सिद्धेश तेलवेकर याने तृतीय क्रमांक मिळविला. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखेत वैष्णवराज पाटील याने द्वितीय क्रमांक तर शुभम दत्ता याने तृतीय क्रमांक मिळविला. या उल्लेखनीय कामगिरीसोबतच महाविद्यालयातील एकूण १८ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या या संघाला सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रीतम शिंदे आणि वनस्पती शास्त्र विभागाच्या डॉ. लीना शितोळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अशा तीन स्तरावर घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये ३७ कृषि महाविद्यालयांचे २३० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

## डॉ. सर्जेराव सव्वाशे यांची कसबे डिग्रज येथील कृषि तंत्र विद्यालयास भेट

**दि. डिसेंबर, २०२५.** कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, ता. मिरज येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठातील महाबळेश्वर येथील गहू गेरवा केंद्रातील माजी कवक शास्त्रज्ञ डॉ. सर्जेराव सव्वाशे यांनी भेट दिली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी होते. यावेळी डॉ. सर्जेराव सव्वाशे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की अळिंबी आहारातील प्रथिनांचा उत्कृष्ट स्रोत आहे. मानवी शरीराला प्रथिनांची दररोज आवश्यकता असते. सध्या अळींबी उत्पादनाला चांगले दिवस आहेत. यातून चांगल्या प्रकारे रोजगार निर्मिती होऊ शकते. यामुळे युवक आत्मनिर्भर होतील. शासनाकडून युवक सहकारी संस्था व ॲग्री स्टार्टअपसाठी अनेक प्रोत्साहन योजना असून यात अळिंबी उत्पादन प्रकल्प राबविता येतो या प्रकल्पामुळे रोजगार निर्मितीस हातभार लागेल. आळिंबी उत्पादनामध्ये महिलांना तसेच युवकांना रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल. यावेळी डॉ. मनोज माळी यांनी यावेळी सांगितले की तयार अळिंबी सोलर ड्रायर मध्ये

वर्ष :५, अंक क्रं. : ६०, डिसेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



सुकविता येते. त्यापासून पावडर निर्मिती करून बेबी फूड, आयुर्वेदिक उत्पादनामध्ये पावडरचा उपयोग करता येतो. सुकविलेल्या मशरूमपासून लोणचे, ठेचा, पावडर, पापड, इन्स्टंट ग्रीन टी, कॉफी, सूप अशी मूल्यवर्धित उत्पादने तयार करता येतात. भविष्यात विद्यार्थ्यांनी स्वतःचा ब्रँड तयार करून ताजी अळिंबी आणि प्रक्रिया उत्पादनांची ऑनलाइन विक्री करावी. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी या प्रकल्पातून चांगल्या प्रकारे ज्ञान घ्यावे असे डॉ. माळी म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कृषि तंत्र विद्यालयातील श्री. प्रज्वल गागरे, श्री. गणेश खांबाइत, श्री. नितीन घोरपडे, श्री. राजू कापसे, श्री. गजानन डाखोरे, श्री. रवींद्र भगत यांनी सुयोग्य नियोजन केले. याप्रसंगी कृषि तंत्र विद्यालयातील ८० विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, कोल्हापूरचे अविष्कार- २०२५ स्पर्धेमध्ये घवघवीत यश



**दि. ६ डिसेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि शरदचंद्र पवार कृषि व संलग्न महाविद्यालय शारदानगर, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतरमहाविद्यालय आविष्कार-२०२५ संशोधन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी उत्साहात पार पडला. या स्पर्धेसाठी एकूण ३७ महाविद्यालयाचा सहभाग नोंदविला होता. एकूण २२७ विद्यार्थी संशोधक (१२३ मुले १०४ मुली) यांनी विविध संशोधन गटामध्ये प्रकल्प सादर केले होते. या स्पर्धेचे प्रमुख ०६ श्रेणीमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. त्यामध्ये मानवी विद्या, भाषा, ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन व विधी, शुद्ध विज्ञान, कृषि व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, फार्मसी व वैदिक या सर्व गटांमध्ये विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संशोधन सादरीकरण केले होते. या श्रेणीमधील संशोधन प्रकल्प राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी निवड करण्यात आली असून त्यामध्ये डॉ. शरदचंद्र पवार कृषि व संलग्न महाविद्यालय, बारामती ११ संशोधन प्रकल्प, कृषि महाविद्यालय, पुणे ८ संशोधन प्रकल्प, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर ७ संशोधन प्रकल्प, कृषि महाविद्यालय, धुळे ४ संशोधन प्रकल्प, पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरीचे ४ संशोधन प्रकल्पांचा समावेश आहे.

या स्पर्धेसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूरच्या चा २९ संशोधक विद्यार्थ्यांचा संघ निवडण्यात आला

होता. ही स्पर्धा दोन स्तरांमध्ये घेतली गेली पहिल्या स्तरांमध्ये संशोधन विषयाचे भित्तिपत्रक सादरीकरण केले होते. त्यातून ठराविक विद्यार्थी निवडले गेले होते. त्यापैकी २२६ विद्यार्थ्यांमधून एकूण ९२ विद्यार्थांनी पीपीटी सादरीकरणासाठी निवडण्यात आले. त्यापैकी १७ विद्यार्थी हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूरचे होते त्यापैकी सात पदवी व पदव्युत्तर च्या विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली. त्यामध्ये द्वितीय पारितोषिक खंदारे ओम बबन, तृतीय पारितोषीक साळवे पल्लवी विकास, चव्हान यश बबन, राऊत निकिता विलास, द्वितीय पारितोषीक स्नेहल पंढरीनाथ घुगे, तृतीय पारितोषीक आकांक्षा किशोर कदम, प्रांजल मांजरे यांना मिळाले. या संशोधन प्रकल्प निवडण्याची जबाबदारी डॉ. डी.डी. पतंगे व प्रा. मुकुंद गुंड यांनी पार पाडली. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. गुंड व डॉ. भालेराव यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांना महाविद्यालाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे, उपाध्यक्ष विद्यार्थी परिषद डॉ. भारत कोलगणे व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र
**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २८२९/२०२६**